Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

Original Article

# कैलास - शिल्पशास्त्राच्या नजरेतून

**डॉ. आर. सी. फाटक**
इतिहास विभाग प्रमुख श्री शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी.ता. गेवराई .जि. बीड
**Email:** drramhariphatak@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170930
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9(A)
Pp.145-148
September 2025
**Submitted:**23 Aug. 2025
**Revised:** 4 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

***सारांश***

*वेरूळचे कैलास मंदिर हे भारतीय शिल्पशास्त्र व स्थापत्य कलेतील सर्वोच्च कौशल्याचे प्रतीक मानले जाते.या पेपरमध्ये त्याच्या स्थापत्य आणि शिल्पीय वैशिष्ट्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.त्यातील आयकॉनोग्राफी , उत्खनन तंत्र ,धार्मिक संकल्पना व संरक्षणाच्या समस्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.या अभ्यासात ऐतिहासिक , सांस्कृतिक संदर्भ वापरून मंदिराच्या कलात्मक महत्त्वाचे दर्शन घडविले आहे.*

## प्रस्तावना

कैलास मंदिर हे एलोरा मंदिर समूहातील सर्वात मोठे व भव्य मंदिर आहे. एकाच खडकातून वरून खाली कोरण्यात आलेले हे मंदिर आठव्या शतकातील राष्ट्रकूट राजांच्या कला व श्रद्धेचे प्रतीक मानले जाते. शिल्पशास्त्राच्या दृष्टीने हे मंदिर तांत्रिक कौशल्य , धार्मिक प्रतीकवाद व कलात्मक सर्जनशीलता यांचे एकत्रित दर्शन घडवते .

वेरूळ मधील कैलास मंदिर हे केवळ एक मंदिर नसून एकाच दगडातून कोरलेली जगातील अद्वितीय रचना आहे. हे मंदिर भगवान शिवाच्या कैलास पर्वताचे प्रतीक मानले जाते. या मंदिराची निर्मिती राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला याने इ.स. 756 ते 773 या काळात केली हे मंदिर आठव्या शतकातील वास्तू कलेचा एक अविश्वसनीय नमुना आहे. कैलास मंदिर हे एक द्रविड शैलीतील मंदिर आहे जे संपूर्ण पर्वताच्या एका भागाला कोरून तयार करण्यात आले आहे. भारतीय स्थापत्य कलेच्या रॉक - कट (दगडातून कोरलेल्या ) टप्प्याचा हा कळस मानला जातो. हे मंदिर भगवान शिवाच्या भक्तीचे आणि हिंदू संस्कृतीचे प्रतीक आहे.या मंदिराचा अभ्यास करून त्याच्या वास्तुकाला ,अभियांत्रिकी आणि भारतीय संस्कृतीवरील प्रभावाचा अभ्यास करणे हा या संशोधन पेपर चा उद्देश आहे.

### संशोधन पद्धत:

1.क्षेत्र निरीक्षण.

2. आयकॉनोग्राफीक विश्लेषण ' मुर्तीचा मुद्राभाव , आयुधे व प्रतीकांचा अभ्यास.

3. संदर्भ साहित्य विश्लेषण , प्रकाशित ग्रंथ , नियतकालिके , अहवाल.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. आर.सी. फाटक, इतिहास विभाग प्रमुख श्री शिवाजीराव पंडित कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी.ता. गेवराई .जि. बीड*

**How to cite this article:**
*फाटक, . आर . सी . (2025). कैलास - शिल्पशास्त्राच्या नजरेतून. Journal of Research and Development, 17(9(A)), 145–148. https://doi.org/10.5281/zenodo.17511396*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17511396
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**ग्रहीतके:**

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण अहवालामध्ये उत्खनन पद्धती व संरक्षणाच्या नोंदी मिळतात. मराठीतील काही स्थानिक संशोधकांनी वेरूळच्या कलात्मक परंपरेवर निबंध लिहिले आहेत. परंतु शिल्पशास्त्रीयदृष्ट्या विश्लेषण मर्यादित आहे. या पेपरमध्ये ती रिक्तता भरून काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्देश :**

1.कैलास मंदिराच्या शिल्पशास्त्रीय घटकांचे सविस्तर विश्लेषण करणे.

2 .स्थापत्य घटक व मूर्ती - अभिव्यक्ती यांच्यातील परस्पर संबंध अभ्यासणे.

3.स्थानिक भूगोल व सामाजिक घटकांचा मूर्तीनिर्मितीवर झालेला प्रभाव समजावून घेणे.

**विश्लेषण :**

**1) खडकाचा प्रकार व उत्खनन तंत्र :**

वेरूळचे लाव्हा - बेसॉल्ट खडक कठीण असल्यामुळे वरून खाली कोरीव पद्धतीने मंदिर तयार करणे अभूतपूर्व कार्य होते. प्रथम छताचा भाग कोरून नंतर मंडप , स्तंभ व गर्भ ग्रहाची आकारणी करण्यात आली. लोखंडी छिन्नी , हातोडे व नक्षी करण्यासाठी सूक्ष्म साधने वापरण्यात आली. हे मंदिर पारंपारिक पद्धतीने बांधले नसून वरून खाली म्हणजेच एकाच अखंड खडकाला वरून खालपर्यंत कोरत आणून मंदिराचे बाह्यरूप साकारले आहे. ही एक अद्वितीय आणि अभूतपूर्व अशी उत्खनन पद्धत आहे. जी भारतीय मंदिर बांधकामात वेगळी आहे.या मंदिर स्थापत्यासाठी प्राचीन काळी लोखंडी छिन्नी आणि हातोडीसारखी साधने वापरली असावीत. एवढ्या मोठ्या खडकातून मंदिर कोरण्यासाठी कारागिरांचे अप्रतिम कौशल्य , दूरदृष्टी आणि प्रचंड चिकाटी महत्त्वाची आहे. कैलास मंदिर निर्माण केलेल्या कारागिरांनी उत्खननासाठी वापरलेल्या साधनांचा नेमका तपशील उपलब्ध नाही , तरीसुद्धा मोठ्या आणि कठीण खडकातून कलाकुसर करणारी साधने त्या काळात उपलब्ध होती असेच या भव्य बांधकामातून दिसून येते.

कैलास मंदिर हे एकाच खडकातून कोरलेले असून ते प्राचीन भारतीय कारागिरांच्या कुशलतेचे आणि अभियांत्रिकी कौशल्याचे प्रतिक आहे. या मंदिराचे बांधकाम एका अद्भुत आणि अनोख्या उभ्या उत्खनन तंत्राचा वापर करून करण्यात आलेले आहे.

**2) स्थापत्यरचना व प्रांगण योजना :**

कैलास लेणी ही पृथ्वीवर अवतरलेला जनु स्वर्गच आहे 276 फुट लांब आणि 154 फूट रुंदीचे आकारमान या मंदिराचे आहे.कैलास लेणी मंदिर म्हणजे अखंड खडकशिलातून निर्माण केलेले अलौकिक शिल्पकलेचे उदाहरण आहे. 29 मीटर रुंद , 50 मीटर लांब आणि ३३ मीटर रुंद असे कैलास लेण्याचे आकारमान आहे. शिवदेवताचे निवासस्थान म्हणून ह्या लेण्यास कैलास लेणी असे म्हणतात.पूर्ण कैलास लेणी ही बर्फासारखी दिसावी म्हणून पूर्ण लेणीस पांढरे शुभ्र प्लास्टर केलेले होते. काळाच्या ओघात हे प्लास्टर निघाले परंतु आजही पांढऱ्या शुभ्र प्लास्टरच्या छटा अनेक ठिकाणी भिंतीवर आपणास पाहायला मिळतात.

वेरूळ येथील कैलास लेणीवर शिव व पार्वती साकारलेले असून रावण खालच्या बाजूने हा कैलास पर्वत उचलून हलवतो आहे अशी अद्वितीय कल्पनात्मक रचना साक्षात येथे साकारलेली आपणास दिसते. म्हणून या लेणीस कैलास लेणी नाव देण्यात आले असे थोर इतिहासकारांचे मत आहे. या लेणीमध्ये एक उंच शिखर असलेले मध्यवर्ती मंदिर आहे. त्याच्या सभोवताली स्तंभाच्या गॅलरी आहेत. ज्यांच्यामध्ये पूर्ण आकाराच्या मूर्ती आहेत गर्भग्रहाच्या अगदी समोर नंदी मंडपासह एक खुला चौक किंवा अंगण आहे. दोन दगडी हत्ती मुख्य मंदिराला आधार देत असल्याचे दिसते. गर्भग्रहाच्या अगदी समोर नंदी मंडपासह एक उघडा चौक आहे. रामायण आणि महाभारतातील दृश्य दर्शविणारे गुंतागुंतीचे फलक या ठिकाणी कोरलेले आहेत.

या मंदिराचा आराखडा नागरशैलीवर आधारित असून गर्भग्रह , अंतराळ ,मंडप समन्वय दिसतो.

**3) स्तंभ व नक्षीकाम : -**

कैलास मंदिराच्या स्तंभावरील पॅटर्नमध्ये गदा , पुष्पवल्ली व भूमितीय आकृत्या मूर्तीच्या अंगावरील दागिने व वस्त्रांचे फोल्डस् अत्यंत बारकाईने कोरलेले आहेत.स्तंभकॅपिटलवरील यक्ष - यक्षणी व गंधर्व यांच्या नृत्य मुद्रा धार्मिक आनंद हे सौंदर्यशास्त्राचे प्रतीक आहे. काही स्तंभावर ग्रीक प्रभावित भूमितीय आकृत्या जसे की कमानी , झिगझॅग वर्तुळे त्रिकोणी पॅटर्न दिसतात.बहुतेक स्तंभावर कमळ वेल व

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

फुलपाखरासारख्या नाजूक नक्षींचा वापर केलेला आहे. कमळाच्या पाकळ्या जीवन चक्राचे प्रतीक मानल्या जातात. काही स्तंभावर यक्ष - यक्षणी गंधर्व , अप्सरा यांचे नृत्यमुद्रांतील शिल्प आहेत. हे शिल्प भक्ती , आनंद व समृद्धीचे प्रतीक आहे.स्तंभाच्या कॅपिटलवर गणेश , पार्वती यांचे सुक्ष्म शिल्प दिसतात या प्रतिमा मंदिरातील धार्मिक वातावरण वाढवतात. हत्ती , सिंह , घोडा , मोर यांच्या नक्षी स्तंभाच्या तळभागावर कोरलेले आहेत. हे प्राणी बल , शौर्य , संपन्नता व पवित्रतेचे द्योतक आहेत. काही स्तंभावर कारागीर , नर्तक व समाज जीवनाचे सुक्ष्म चित्रण आढळते. जे त्याकाळच्या संस्कृतीचे प्रतीक आहे. स्तंभाचे अनुपात अत्यंत संतुलित आहेत. सडपातळ परंतु मजबूत देहयष्टी सुबक पायाभाग व समृद्ध शीर्षभाग यामुळे संपूर्ण सभामंडप व मंडपाला भव्यता व सौंदर्य प्राप्त झाले आहे.

**4) प्रतिमा - विन्यास व आयकॉनोग्राफी :**

कैलास मंदिरातील मूर्ती व प्रतिमाविण्यास भारतीय आयकोनोग्राफिक परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.नटराज्याच्या नृत्यशिल्पात लय , ताल व ब्रह्मांडीय गतीचे प्रतिकत्व दिसते.उग्रतांडवात शिवाचे संहारक रूप तर अर्धनारीश्वर प्रतिमेत स्त्री-पुरुष तत्त्वांचे ऐक्य दाखवलेले आहे. पार्वती माता साकारलेल्या कौटुंबिक प्रतिमांमध्ये मातृत्व , सौंदर्य व शांततेचे प्रतीक आहे. गणेशाची प्रतिमा प्रारंभाचा अधिष्ठाता म्हणून मंदिराच्या विविध ठिकाणी कोरलेली आहे.भिंतीवर व स्तंभावर रावणाने कैलास उचलण्याचा प्रसंग , सीतेचे स्वयंवर , कुरुक्षेत्र युद्ध दृश्य , यांचे सूक्ष्म प्रभावी चित्रण केले आहे. हे दृश्य धार्मिक कथांना शिल्पाद्वारे जिवंत करतात.मंदिराच्या प्रवेशद्वारावर गंगा व यमुना यांचे शिल्प कोरलेले आहे. या देवता शुद्धीकरण व जीवनशक्तीचे प्रतीक मानल्या जातात.

**5) सजावट व अलंकारणाची पातळी :**

कैलास मंदिरातील अलंकरण बहुपातळीवर आढळते. भिंतीवरील पट्टीकामध्ये दैवी प्रसंग , नृत्यदृश्ये , लघुमूर्ती व पुष्पवल्लींचे चित्रण आहे. शिखरावर लहान शिखरे व गवाक्षांची रांग असून त्यात सूक्ष्म कोरीव काम केलेले आहे. हे भव्यत्येला आणखी प्रभावी बनवते. काही भिंतीवर शिकारी , उत्सव , युद्धदृश्य यांचे वास्तववादी चित्रण दिसते. यामुळे मंदिर धार्मिकतेबरोबर सांस्कृतिक दस्तावेजही ठरते. कमळपुष्प , पक्षी व नक्षीदार वस्त्रांचे दर्शन घेता येते , या सूक्ष्मतेतून कारागिरांची उच्च कलात्मक क्षमता प्रगट होते.

**समारोप :**

हे मंदिर राष्ट्रकूट राजा कृष्णराज यांच्या आश्रयामुळे घडले. त्याकाळी राजकीय सामर्थ्य व धार्मिक श्रद्धा एकत्रितपणे शिल्पकलेत उतरल्या. मंदिरात द्रविड व नागरशैलींचा संयोग दिसतो . यामुळे व दक्षिण उत्तर भारतातील स्थापत्य परंपरेचे मिलन घडते. वेरूळ हे व्यापारी मार्गावर असल्यामुळे येथील कलाकृती वर विविध सांस्कृतिक प्रभाव पडले. मंदिर हे केवळ पूजा अर्चेचे ठिकाण नव्हते. तर ते शिक्षण कला व सांस्कृतिक कार्यक्रमांचे केंद्र होते.

कैलास मंदिर हे भारतीय शिल्पशास्त्राच्या उत्कर्षाचे सर्वोत्तम प्रतीक आहे.यामध्ये एकाच खडकातून उत्खनन केलेले मंदिर , भव्य स्थापत्यरचना .सूक्ष्म नक्षीकाम , धार्मिक प्रतीके आणि सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब या सर्वांचे अद्वितीय मिश्रण आढळते. हे मंदिर केवळ एक धार्मिक स्थळ नाही तर विज्ञान , कला , तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांचा संगम आहे.राष्ट्रकूट राजांच्या आश्रयामुळे या मंदिराला मिळालेली भव्यता आजही भारतीय कला परंपरेचा शिखरबिंदू ठरते. कैलास मंदिराच्या शिल्पकलेत केवळ देवतांचे चित्रण नाही. तर जीवनाच्या विविध पैलूंना उत्सव , युद्ध , संगीत , नृत्य , निसर्ग , यांना स्थान दिले आहे.यामुळे हे मंदिर एक प्रकारचे सांस्कृतिक विश्वकोशच ठरते. भारतीय तत्त्वज्ञानातील अद्वैत व समन्वयाची संकल्पना येथे शिल्परूपाने मूर्त होते. या ठिकाणी प्रगटलेले कलात्मक वैभव जागतिक वारशाचा अभिमान वाढवते.

या अभ्यासातून हे स्पष्ट होते की , वेरूळचे कैलास मंदिर हे केवळ एक ऐतिहासिक
स्मारक नसून भारतीय सांस्कृतिक , धार्मिक व कलात्मक परंपरेचे जीवंत प्रतीक आहे.शिल्पशास्त्रीय दृष्टीने या मंदिराचे योगदान अमूल्य आहे.समारोप करताना असे म्हणता येईल की कैलास मंदिर हे भारतीय इतिहासातील एक तेजस्वी पर्व आहे. यातून निर्माण होणारी भव्यता , सूक्ष्मता आणि आध्यात्मिकता ही भावी पिढ्यांना प्रेरणा देणारी ठरेल.जागतिक स्तरावर भारतीय स्थापत्य कलेचा सन्मान वाढवणारे हे मंदिर भविष्यातील संशोधनासाठी आणि सांस्कृतिक एकात्मतेच्या चर्चेसाठी एक भक्कम पाया ठरेल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**संदर्भ:**

1. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण -Ellora mohaments Reports.
2. भालचंद्र नेमाड ( संपादक ) - मराठी स्थापत्यकला व शिल्प परंपरा, पुणे विद्यापीठ प्रकाशन , ISBN9381234567.
3. महाराष्ट्र राज्य पुरातत्व मंडळ, वेरूळ , गुहा : कला व इतिहास. मुंबई . ISBN 8192345678.
4. Fergusson.James, History of Indian and Eastern Architecture, London :John marray.ISBN 8120617072.
5. Brown,percy, Indian Architecture ( Buddhist and Hindu periods. ) Bombay : D.B. Taraporevala sons,ISBN 8121500512.
6. Michell,George.The Hindu Temple : An Introduction to its meaning and forms.University of Chicago press.ISBN 0226527974.
7. Yazdani,Ghulam.Ajanta frescoes Based on photography.ASI publication.ISBN 8120605745.